**पुष्प – २२ : क्षमा**

**करी वाड पोट । समुद्र जेवि ।...**

१. क्षमा हा दैवी गुण होय. क्षमेचा अंगीकार आपण नित्य केला तर आपल्या हातून हिंसा होण्याची शक्यताच उरत नाही.

२. माउली मुक्ताबाई ज्ञानोबारायांना तेच तर समजावितात : पाण्याने आग विझते त्याच न्यायाने क्षमेद्वारे वितंडवाद, विध्वंस, संघर्ष निवून जातो.

३. समोरच्याने कितीही आगळीक केली, कितीही चुका अथवा अशोभनीय वर्तन केले तरी आपण उदार अंतःकरणाने ते अपराध पोटात घालावेत : त्यासाठी ज्ञानोबाराय दृष्टान्त देतात समुद्राचा.

४. निवृत्तिनाथमहाराजदेखील ज्ञानोबारायांचे वर्णन 'शांतिपूर्ण क्षमा ज्ञानदेवो' अशाच शब्दांत करतात.

५. ज्ञानोबाराय क्षमेलादेखील एक विशेषण जोडतात : अनाक्रोश

**********************************************

**संतबोल**

- विश्व रागें जालें वन्ही। संती सुखें व्हावें पाणी।। (श्रीमुक्ताबाईमाउली)
- घेउनि जळाचे लोट। आलिया नदीनदांचे संघाट। करी वाड पोट। समुद्रु जेवीं।। (ज्ञा. १३.३४९)
- हे अनाक्रोश क्षमा। जयापाशीं प्रियोत्तमा। जाण तेणें महिमा। ज्ञानासि गा।। (ज्ञा. १३.३५९)

**मंजिरी – २२**

१. भेदभावनेमधून राग निर्माण झाला तरी दयेने त्याच्यावर मात करता येते : दया हे संतांचे, म्हणजेच विवेकी व्यक्तीचे एक मुख्य लक्षण असे तुकोबारायांचे कथन आहे.

२. मात्र त्यांतही तारतम्य राखावे लागते.

३. क्षमा असेल तरच दया संभवते.

४. दया आणि क्षमा यांचा पाया समता हा होय :

************************************************

**संतबोल**

- धन्य ते संसारीं। दयावंत जे अंतरीं।। (श्रीतुकोबाराय)
- दया तिचें नांव भूतांचें पाळण। आणीक निर्दळण कंटकांचें।। (श्रीतुकोबाराय)
- दया करणें जें पुत्रासी। ते चि दासा आणि दासी।। (श्रीतुकोबाराय)
- ऐसी जयाची चाली। कृपाफळीं फळा आली। देखसी जियाली। दया वाचे।। (ज्ञा. १३.२६०)